प्रेस रिलीज

# महिंद्राची वाहने खरेदी करण्याची नवीन संकल्पना ‘ओन-ऑनलाइन’

- स्मार्ट, कॉन्टॅक्टलेस आणि आगळा अनुभव देणारी, भारतातील सर्वांत परिपूर्ण, ‘एंड-टू-एंड’ स्वरुपाची कार खरेदीची योजना सादर.
- चार सोप्या क्रियांमध्ये आपल्या जुन्या गाडीचा विनिमय, वित्तसाहय, विमाखरेदी करून ग्राहक आपल्या पसंतीची महिंद्रा गाडी खरेदी करू शकतात, तसेच आपल्या आवडीनुसार गाडीमध्ये उपकरणे बसवून सुशोभीकरण करू शकतात.
- महिंद्राचे देशभरातील 270हून अधिक वितरक आणि 900हून अधिक ‘टचपॉईंट्स’ यांच्या माध्यमातून ओन-ऑनलाईन संकल्पनेसाठी त्वरीत मदत, स्वच्छ पद्धतीने ‘होम टेस्ट-ड्राईव्ह’ आणि गाडीचे वितरण.

**मुंबई, मे 8, 2020 :** 20.7 अब्ज डॉलर्सची उलाढाल असलेल्या महिंद्रा समुहातील महिंद्रा अँड महिंद्रा लि. (एम अँड एम लि.) या कंपनीने ओन-ऑनलाईन ही भारतातील सर्वांत परिपूर्ण, ‘एंड-टू-एंड’ स्वरुपाची, कार खरेदीची योजना सादर केली आहे. महिंद्राच्या वाहनाची मालकी नव्या स्मार्ट पद्धतीने मिळवण्यासाठी ‘ओन-ऑनलाईन’ ही सर्वंकष, 24 तास कार्यरत असणारी सुविधा कंपनीने ग्राहकांना उपलब्ध करून दिली आहे. तिच्या माध्यमातून ग्राहक या वाहनासाठी वित्तसाहय, विमाखरेदी, आपल्या जुन्या वाहनाचा विनिमय, गाडीतील विविध उपकरणांची निवड आदी बाबी चार साध्या क्रियांमधून घरी आरामात बसून पूर्ण करू शकतात. **(www.mahindrasyouv.com/Own-Online).**

**महिंद्राचे वाहन खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी करावयाच्या चार साध्या क्रिया :**

**1. शोध घ्या आणि वैयक्तिकृत करा**

महिंद्राच्या एसयूव्हीची विस्तृत श्रेणी पाहून आपली गाडी निवडा व आपल्या आवश्यकतेनुसार ती सुशोभित करा.

**2. विनिमय मूल्य त्वरीत मिळवा**

पसंतीचा वितरक, विक्रेता निवडा आणि आपल्या जुन्या कारसाठी त्वरित कोटेशन मिळवा.

**3. वित्तपर्याय व विमा निवडा**

वित्तसाहय आणि विमा योजनांमधून सुयोग्य पर्याय निवडा आणि ऑनलाइन मंजुरी मिळवा.

**4. पेमेंट व वितरण @ घरपोच**

पैसे भरा आणि पसंतीच्या ठिकाणी 'कॉन्टॅक्टलेस' डिलिव्हरी मिळवा.

'ओन-ऑनलाईन'च्या योजनेबाबत 'महिंद्रा अँड महिंद्रा लि.'च्या 'ऑटोमोटिव्ह डिव्हिजन'चे मुख्य कार्यकारी अधिकारी वीजय नाकरा म्हणाले, "आज आम्ही भारतातील सर्वात परिपूर्ण, एंड-टू-एंड, ऑनलाइन कार ओनरशिपसाठी 'ओन-ऑनलाईन' हा प्लॅटफॉर्म सादर करीत आहोत. महिंद्राचे वाहन साध्या, सोप्या अशा चार क्रियांमधून मिळवण्याचा हा उत्तम मार्ग आहे. पिझ्झाची ऑर्डर देऊन तो मिळवण्यासाठी जेवढा वेळ लागतो, त्याहूनही कमी वेळात ग्राहकाला महिंद्राच्या गाडीची मालकी आता मिळू शकते."

नाकरा पुढे म्हणाले, "गाडी खरेदी करण्यापूर्वी आणि खरेदी केल्यानंतरच्या काही योजना आम्ही ऑनलाईन स्वरुपात यापूर्वी सादर केल्या होत्या. त्यापुढे जाऊन 'ओन-ऑनलाईन' ही योजना आम्ही आता ग्राहकांसाठी आणली आहे. गेल्या काही काळांत विविध वस्तूंची खरेदी ऑनलाईन पद्धतीने करण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे, अशात वाहनांची खरेदीही ऑनलाईन करणे यालाही महत्त्व प्राप्त होत आहे. आमच्या ग्राहकांना अनेक पहिले अनुभव देऊन आम्ही वाहन विक्री क्षेत्रात या बदलाचे नेतृत्व करण्यास तयार आहोत."

'ओन-ऑनलाईन' या अतिशय सुरळीतपणे चालणाऱ्या प्रकियेमध्ये ग्राहक त्यांच्या पसंतीच्या गाडीची निवड करून ती मनाप्रमाणे सुसज्ज करू शकतात. त्यानंतर जुन्या गाडीचे तपशील नोंदवून तिच्यासाठी उत्तम विनिमय मूल्य निश्चित करणे, वित्तसाह्य व विमाखरेदी यांच्या किंमती मिळवणे या गोष्टी काही क्लिक्समध्ये करून वाहन नोंदणीसाठी पैसे ऑनलाईन भरू शकतात. अशा प्रकारे वाहनाची मालकी मिळवण्याचा हा प्रवास खऱ्या अर्थाने 'एंड-टू-एंड' व 'ऑनलाईन' स्वरुपात पार पडतो.

महिंद्राचे देशभरातील 270 हून अधिक वितरक व 900 हून अघिक टचपॉईंट्स हे या 'ओन-ऑनलाईन' योजनेशी निगडीत असून त्यांच्याकडून ग्राहकांना आवश्यक ते तांत्रिक पाठबळ व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मदत मिळते. अत्यंत सुरळीत व व्यक्तिगत स्वरुपाच्या या 'एंड-टू-एंड' अनुभवामुळे ग्राहकांना ऑनलाईन खरेदीची सुविधा आणि स्थानिक पातळीवरची मदत या दोन्हींचा लाभ घेता येतो. महिंद्राच्या वितरकांना ऑनलाईन विक्री करण्याबाबत सर्व तांत्रिक सहाय्य पुरविण्यात आले आहे, तसेच ग्राहकाला प्रत्यक्ष भेटण्याची वेळ कमी यावी, यासाठीचे प्रशिक्षणही देण्यात आले आहे. टेस्ट-ड्राईव्ह, कागदपत्रांचे संकलन आणि गाडीचे वितरण या गोष्टी पार पाडताना स्वच्छता व आरोग्यविषयक काळजी कशी घ्यायची, हेही वितरकांना समजावून सांगण्यात आले आहे.

**ओन-ऑनलाईन - वाहनविक्रीची नवी परिभाषा**

वाहन-मालकीच्या प्रवासात खरेदीपूर्व व खरेदीपश्चात अशा दोन टप्प्यांचे एकत्रिकरण करून ओन-ऑनलाईन ही सर्वंकष योजना बनविण्यात आली आहे. यामध्ये नव्या युगातील गाहकाला संपूर्ण

पारदर्शकता, वैयक्तिकरण आणि सोयीचे फायदे देण्याचे कंपनीकडून वचन मिळते. वाहन निवडीपासून ते वितरणापर्यंत पारदर्शक, अखंड आणि संपर्कविरहित अनुभव देण्यासाठी ही प्रक्रिया रचण्यात आलेली आहे. याव्यतिरिक्त, ग्राहकास स्वतःची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कोणत्याही मदतीची आवश्यकता असल्यास, कंपनीचे उत्पादन आणि प्रक्रिया तज्ञ एका 'क्लिक'वर 'चॅट'च्या माध्यमातून (व्हिडिओ आणि मजकूर) ऑनलाइन उपलब्ध असतील.

खरेदीच्या या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर 'ओन-ऑनलाईन' हा प्लॅटफॉर्म उच्च सुविधा, पारदर्शकता आणि वैयक्तिकरण या सुविधा देऊन कारखरेदी सुलभ करतो. जुनी कारची देव-घेव करण्याच्या विचारात असलेल्या ग्राहकांना, त्यांच्या जुन्या कारचे सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने त्वरीत, रिअल-टाइम ऑनलाइन कोटेशन देण्यात येते. पुढे, वित्तपुरवठ्याचा पर्याय हवा असणाऱ्यांना त्यांची वित्तपात्रता तपासून घेता येते व त्याचे ऑनलाइन मंजुरीपत्र त्यांना मिळू शकते. या 'पोर्टल'द्वारे ग्राहकाला विविध विमाधारकांकडून कोटेशन मिळण्याचा पर्याय उपलब्ध आहे, त्यातून निवड करून वाहन विमा पूर्ततेची प्रक्रिया संबंधित वितरकाकडून केली जाईल. या 'प्लॅटफॉर्म'च्या माध्यमातून गाडीत बसवायची उपकरणे व इतर सोयी-सुविधा ग्राहक निवडू शकतात, त्याचप्रमाणे वाढीव वॉरंटी व रस्त्यावरील संभाव्य मदतीसाठी तरतूदही करू शकतात.

'ओन-ऑनलाईन' हे कार खरेदीसाठीचे असे एकमेव व्यासपीठ आहे, ज्यामध्ये ग्राहकांना वितरकांद्वारे सादर करण्यात आलेल्या गाडीच्या 'ऑन-रोड' किंवा प्रत्यक्ष व्यवहाराच्या किंमती त्वरीत समजू शकतात. यामध्ये वाहन नोंदणी शुल्क, रस्ते वाहतूक कर, विमा इत्यादी सर्व घटकांचे विश्लेषण, तसेच सवलती यांची माहिती मिळते.

खरेदीपूर्व, प्रत्यक्ष खरेदी व खरेदीपश्चात अशा सर्व स्तरांवरील अप्रतिम सेवा ऑनलाईन पद्धतीने देऊन, या प्रत्येक स्तरावर अनोखा अनुभव ग्राहकांना देण्याचे काम महिंद्राने 'ओन-ऑनलाईन'द्वारे केले आहे.

'एस-यू-व्ही' या महिंद्राच्या खरेदीपूर्व प्लॅटफॉर्मवर ग्राहक आपल्या कुटुंबियांच्या सोयीसाठी निवडलेले वाहन अत्यंत सुलभतेने नोंदवू शकतात, तसेच कुटुंबियांनाही या निर्णयप्रक्रियेत सामील करू शकतात. 'विथ यू हमेशा' या महिंद्राच्या खरेदीपश्चात प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून ग्राहक ऑनलाइन पध्दतीने गाडीची देखभाल-दुरुस्तीच्या सेवेसाठी नोंदणी करू शकतात, वाहनाचा देखभालीसंबंधीचा इतिहास पाहू शकतात, घेतलेल्या सेवांच्या पावत्या प्राप्त करू शकतात व इतरही अनेक सुविधांचा लाभ घेऊ शकतात. आता, महिंद्रा कंपनी वाहन विक्री करण्याची भारतातली पध्दत बदलून हा व्यवसाय पुढच्या स्तरावर नेण्यास सज्ज झाली आहे.

या विषयी समाज माध्यमांमधून माहिती मिळवण्यासाठी कृपया वापरा..
**#MahindraOwnOnline**
**#FutureOfAutoRetail**

--

**'महिंद्र'बद्दल**

महिंद्रा समूह हा 20.7 अब्ज डॉलर्स इतकी उलाढाल असलेला अनेक कंपन्यांचा समूह आहे. हा समूह लोकांना नवीन समृद्ध 'मोबिलिटी सोल्यूशन्स' देऊन ग्रामीण भागात समृद्धी आणण्यास तसेच शहरी नागरिकांचे राहणीमान वाढविण्यास मदत करतो. नवीन व्यवसायांचे व्यवस्थापन आणि समाजोपयोगी कार्येही हा समूह करीत असतो. भारतात युटिलिटी वाहनांचे उत्पादन, माहिती तंत्रज्ञान, आर्थिक सेवा आणि पर्यटन स्थळांच्या क्षेत्रातील उद्योग यांमध्ये या समुहाचे नाव अग्रभागी आहे. महिंद्र ही जगातील सर्वात मोठी ट्रॅक्टर कंपनी आहे. या समुहाच्या अन्य व्यवसायांमध्ये कृषी व्यवसाय, एअरोस्पेस, व्यावसायिक वाहने, सुट्या भागांचे उत्पादन, संरक्षण, लॉजिस्टिक्स, रिअल इस्टेट, अपारंपारीक उर्जा, स्पीडबोट्स् आणि पोलाद या उद्योगांचा समावेश आहे. भारतातच मुख्यालय असलेला महिंद्र उद्योग समूह 100 देशांमध्ये 2,40,000 पेक्षा अधिक लोकांना रोजगार देतो.

Www.mahindra.com ही वेबसाईट, तसेच ट्विटर, फेसबुक @MahindraRise यांवर 'महिंद्र'बद्दल अधिक जाणून घ्या.

-

**मीडिया संपर्क**

मोहन नायर
उपाध्यक्ष (कम्युनिकेशन्स)
महिंद्रा अँड महिंद्र लि.
दूरध्वनी - + 91 9004012237
इमेल - nair.mohan@mahindra.com

--